लातूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'बाला (BaLA)' उपक्रमाच्या अंमलबजावणीचा आणि उपयोगितेचा चिकित्सक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्‍यापीठ नांदेड

आंतरविद्‍याशाखीय अभ्यास विद्‍याशाखेतर्गत शिक्षणशास्त्र विषयात
विद्‍यावाचस्पती पदवीच्या अंशत: पूर्ततेसाठी सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधक

महेंद्र अच्युत आल्टे

मार्गदर्शक

डॉ. गौतम रामचंद्र गायकवाड

संशोधन केंद्र

शिक्षणशास्त्र संकुल,स्वा.रा.ती.म.वि.नांदेड.

मार्च २०२३

अनुक्रमणिका

अ.क्र.	विवरण	पृष्ठ क्र.
१	प्रस्तावना	३-४-५
२	संशोधनाची गरज	५
३	संशोधनाचे महत्व	५-६
४	समस्या विधान	६
५	कार्यात्मक व्याख्या	६-७-८
६	संशोधनाची उद्दिष्टे	८
७	संबंधित साहित्य आणि संशोधनाचे समीक्षण	८-९
८	संशोधनाची ग्रहितके	९
९	संशोधनाची व्याप्ती	९
१०	संशोधनाची परीमर्यादा	१०
११	संशोधन पद्धती	१०
१२	संशोधन साधने	११
१३	जनसंख्या	११
१४	नमुना निवड	११
१५	संख्याशास्त्रीय साधने	१२
१६	संशोधनाचे प्रकरणीकरण	१२
१७	कार्यवाहीचे टप्पे	१३
१८	वेळापत्रक	१३
१९	संदर्भ सूची	१४

१) प्रस्तावना:-

अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत तसेच शिक्षण ही देखील मानवाची मूलभूत गरज आहे ही गरज पूर्ण करण्यासाठी मानव सतत प्रयत्न करताना दिसून येतो. मानव नवनवीन गोष्टी सतत शिकून आत्मसात करण्याचा देखील प्रयत्न करत असतो या शिकण्यातूनच त्याचे जगणे समृद्ध होताना आपल्याला दिसते. म्हणजेच शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. मनुष्य जन्मापासून वेगवेगळ्या टप्प्यावरती नवनवीन बाबींचे आकलन करत असतो शाळा, समाज, कुटुंब या ठिकाणी तो आपल्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावत असतो. म्हणजेच तो काहीतरी शिकत असतो हे शिकणे अधिक प्रभावी आणि परिणामकारक कसे होईल याकडे देखील तो कटाक्षाने पाहत असतो शिक्षण हे अधिक प्रभावी होण्यासाठी विविध साधनांचा प्रत्यक्ष वापर केला जात असतो म्हणजेच अध्ययन अध्यापनात विविध शैक्षणिक साधनांचा उपयोग करून ते अधिक परिणामकारक केले जाते.यामुळे विद्यार्थ्यांना एखादी संकल्पना समजण्यास सोपी जाते. शैक्षणिक साधनांना अध्ययन अध्यापनात अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. अध्ययन आणि अध्यापन शैक्षणिक साधना शिवाय केले तर ते प्रभावीपणे होत नाही त्यामुळे सर्वच शिक्षणतज्ञांनी शैक्षणिक साधनांचा पुरस्कार केलेला आपल्याला दिसून येतो शैक्षणिक साधन हे अध्ययन अध्यापन प्रभावी करण्याचे साधन आहे. असेच एक साधन म्हणजे शाळेची इमारत होय शाळेची इमारत सुद्धा एक प्रभावी शैक्षणिक साधन आहे त्या इमारतीचा योग्य वापर केला तर अध्ययन अध्यापन प्रभावी होऊ शकते राजस्थानमधील लोक जंबीश शैक्षणिक कार्यक्रमांतर्गत खेड्यापाड्यात साठ शाळांमध्ये शाळांचे इमारतीचा शैक्षणिक साधनांमध्ये अंतर्भाव करून प्रभावीपणे त्या इमारतींचा वापर करण्यात आली आणि बाला (BALA- Building as Learning Aid) ही संकल्पना त्या ठिकाणी उदयास आली.

शाळा म्हणजे काही फक्त इमारत नाही किंवा शिक्षक व मुलांनी फक्त एकत्र येण्याची फक्त जागा नाही. मुलांच्या शिक्षणासाठी व विकासासाठी ती एक वैशिष्ट्यपूर्ण खास जागा आहे. मुलांच्या विचारांना आकार देणारी, ज्ञानाला साकार स्वरूप देणारी

ती एक जागा आहे. जी त्यांचे कुतहल जागे करून त्यांना सक्रिय बनवते ती त्यांच्या मनात प्रश्न निर्माण करते व उत्तरे शोधायला व समस्या जाणून घ्यायला उद्युक्त करते शाळा मुलांना वातावरणाशी समरस होत भविष्य घडवायला मदत करत असते. म्हणून शाळेवर या सर्वांची मोठी जबाबदारी आहे. त्यामुळे शिकणे व शिकवणे हे एक नित्याचे काम न होता एक सर्वांग सुंदर आनंददायी अनुभव असावा असे शाळेचे वातावरण असणे महत्त्वाचे आहे. शाळेच्या भौतिक वातावरणात फक्त शाळेची इमारत व त्यातील जागाच येते असे नाही तर बाहेरचे मैदान व सुशोभित बगीचा यांचा मुलांचे अनुभव समृद्ध करण्यामध्ये मोलाचा वाटा असतो.

शाळेचा भौतिक परिसर हा शिक्षण प्रक्रियेत एक महत्त्वाचा घटक होऊ शकतो असा विचार आतापर्यंत कोणी गंभीरपणे केला नाही. शाळेच्या परिसराचा शिक्षण प्रक्रियेत जास्तीत जास्त सहभाग म्हणजेच बाला होय. शाळेच्या परिसरातील विशिष्ट जागांमध्ये अभिनव बदल घडवून त्यांचा प्रत्यक्षपणे शिक्षणात सहभाग करून घेता येईल उदाहरणार्थ वर्ग, येण्या-जाण्याच्या जागा, बाह्य परिसर, त्यातील निसर्ग इत्यादी या सर्व ठिकाणचे घटक उदाहरणार्थ फरशी, भिंत, छत, दारे, खिडक्या, फर्निचर, मैदान इत्यादींचा कल्पकतेने वापर करून शैक्षणिक साधने बनवता येतील. यामुळे पुस्तकीय माहिती व शिक्षण प्रक्रिया यातील दुवा ही साधने निर्माण करतील पाठ्यपुस्तके व खडू फळा यांच्या काळ्या पांढऱ्या जगात वावरताना त्रिमितीबद्ध असणाऱ्या या जागा मुलांना अनुभव विश्वात नेऊन सर्वांगीन ज्ञानाचा लाभ देतील अनाकलनीय संकल्पनांना मूर्त स्वरूप देण्याचे काम करतील वेगवेगळे आकार,पोत, कोन, अंतराचे मोजमाप, विविध हालचाली या साध्या साध्या गोष्टी द्वारे भाषाशास्त्र, गणित व भूगोल याविषयीच्या मूलतत्त्वांचे ज्ञान सोप्या पद्धतीने देता येते तसेच ते संस्मरणीय देखील होऊ शकते. भिंती, फरशी, खांब, दारे, खिडक्या, छत, पंखा, पाने, फुले, बिया, अगदी ऊन, पाऊस या सर्वांचा शैक्षणिक साधन म्हणून उपयोग करणे हे बालाचे मुख्य उद्दिष्ट आहे. यामुळे शिक्षण प्रक्रिया मुलांसाठी आनंददाही होऊन त्यांना स्वय अध्ययनाची सवय लागते तसेच ते आपल्या गतीनुसार शिकतात ही शिक्षण

प्रक्रियेत अतिशय महत्त्वाची बाब आहे. म्हणून संशोधकानेलातूर जिल्हयातील जिल्हा परिषद शाळांतर्गत राबविण्यात येणाऱ्या बाला उपक्रमाच्या अंमलबजावणीचा आणि उपयोगितेचा चिकित्सक अभ्यास करण्यासाठी आणि बाला उपक्रमाला अधिकाधिक प्रगतीपथावर आणण्याच्या उद्देशाने हे संशोधन कार्य हाती घेतले आहे.

२) संशोधनाची गरज :-

१) इमारत हीच एक शैक्षणिक साधन आहे म्हणून त्याचा जास्तीत जास्त उपयोग करून अध्ययन अध्ययन प्रक्रिया प्रभावी करता यावी यासाठी संशोधनाची गरज आहे.
२) शाळेच्या वस्तूतील अंतर्गत व बाह्य जागेत मानवनिर्मित व नैसर्गिक घटकामुळे शाळेची वातावरण निर्मिती होते म्हणून या शाळेच्या वातावरणाचा अभ्यास करणे गरजेचे आहे.
३) मुलांमध्ये स्वयं अध्ययनची सवय लावण्यासाठी संशोधनाची गरज आहे.
४) बाला उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे शिक्षण हे मुलांसाठी आनंददाही होऊ शकते.

म्हणून संशोधकाला लातूर जिल्हयातील जिल्हा परिषद शाळांतर्गत राबविण्यात येणाऱ्या बाला उपक्रमाच्या अंमलबजावणीचा आणि उपयोगितेचा चिकित्सक अभ्यास हा संशोधन विषय गरजेचा वाटतो.

३)संशोधनाचे महत्व :-

१) विधयार्थाची शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी महत्वाचे आहे.

२) शिक्षकांच्या नवोपक्रमशीलतेला, क्षमता वाढीस दिशादर्शक ठरणारेआहे.

३) गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे समाजसुधारणेला वाव मिळेल.

४) प्रस्तुत संशोधन बाला उपक्रम राबविताना येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी महत्त्वाचे आहे.

म्हणून संशोधकाला लातूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांतर्गत राबविण्यात येणाऱ्या बाला उपक्रमाच्या अंमलबजावणीचा आणि उपयोगितेचा चिकित्सक अभ्यास हा संशोधन विषय महत्त्वाचा वाटतो.

४) समस्या विधान :-

लातूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'बाला (BaLA)' उपक्रमाच्या अंमलबजावणीचा आणि उपयोगितेचा चिकित्सक अभ्यास

५) कार्यात्मक व्याख्या :-

प्रस्तुत विषयाच्या संशोधनात येणाऱ्या सज्ञांच्या कार्यात्मक व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

१) लातूर जिल्हा :-

महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा विभागातील एकूण आठ जिल्ह्यांपैकी एक जिल्हा म्हणजे लातूर जिल्हा होय. राष्ट्रकूटांची उपराजधानी म्हणजेच लातूर असा ऐतिहासिक संदर्भाधार असणारे तसेच लत्तलूर या प्राचीन नावाने ओळखले जाणारे, रत्नापूर अशीही ओळख राहिलेले म्हणजेच लत्तलूर ते लातूर या विकास क्रमाने विशेष उल्लेखनीय असणारे शहर म्हणजे लातूर होय.

२) जिल्हा परिषद :-

प्रत्येक जिल्ह्याकरिता अध्यक्ष व परिषदेचे सदस्य यांची मिळून एक कार्यकारिणी स्थापन करण्यात येते तिला जिल्हा परिषद असे म्हणतात.तसेच त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्थेतील तिसरा स्तर म्हणजेच जिल्हा परिषद होय.

३) शाळा:- लातूर जिल्हा परिषद अंतर्गत इयत्ता पाच ते सात शाळा होय.

४) राबविणे :-

कार्यान्वित करणे या अर्थाने राबविणे हा शब्द वापरण्यात आलेला आहे. बाला हा उपक्रम जिल्हा परिषदेंतर्गत कार्यान्वित करण्यात आलेला आहे.

५) बाला :-

BaLAचा फुल फॉर्म म्हणजेच पूर्ण रूप **Building as Learning Aid** याप्रमाणे बालाचा फुल फॉर्म आहे.मराठीमध्ये आपण यालाच "शालेय इमारत शिकण्याचे साधन" असे भाषांतरित करू शकतो.

६) उपक्रम :-

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ज्या नवनवीन योजना, कृती आराखडे राबविले जातात त्यांना उपक्रम असे म्हणतात.

७) अंमलबजावणी :-

बाला उपक्रम प्रत्यक्षपणे राबविणे त्याला अंमलबजावणी असे म्हणतात.

८) उपयोगिता :-

बाला या शैक्षणिक उपक्रमाचा शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांना कसा उपयोग होणार आहे हे अभ्यासणे म्हणजे उपयोगिता होय.

९) चिकित्सक अभ्यास :-

चिकित्सक याचा अर्थ 'चिकित्सा करणारे' होय वेगवेगळ्या क्षेत्रात येणाऱ्या समस्या व त्यांची चिकित्सा कशी केली जाते याची स्वतंत्र शास्त्रे असून त्यात त्यांचा संदर्भनिष्ठ अभ्यास केला जातो.

अभ्यास हा मराठी शब्द असून प्रयास, प्रयत्न, कार्य, क्रिया, श्रम, प्रयोग असे विभिन्न समानार्थी शब्द दिसून येतात. शैक्षणिक समस्येतील निराकरण करणे हे अभ्यासाशिवाय केवळ अशक्य प्राय ठरते. समस्या निराकरणासाठी करावयाच्या अभ्यासाला साधनसामग्री व समस्येची संदर्भनिष्ठता जाणून अर्थान्वयन करणे आवश्यक ठरते. म्हणून अशा रीतीने केलेला संदर्भशोध व त्याद्वारा केलेले अध्ययन म्हणजे अभ्यास होय.

६) संशोधनाची उद्दिष्टे :-

१) लातूर जिल्हा परिषद अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या बाला उपक्रमाच्या सद्य स्थितीचा अभ्यास करणे.

२) बाला उपक्रमात शाळांची इमारत ही उत्तम शैक्षणिक साधन आहे याचा अभ्यास करणे.

३) बाला उपक्रमाच्या अमलबजावणी बाबत शिक्षक, मुख्याध्यापक यांना येणाऱ्या विविध अनुभवांचा अभ्यास करणे.

४) बाला उपक्रमाबाबत शैक्षणिक प्रशासनाच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

५) बाला उपक्रमाच्या उपयोगितेचा अभ्यास करणे.

७) संबंधित साहित्य आणि संशोधनाचे समीक्षण :-

पुढील साहित्यांचा वापर सदरील संशोधनासाठी केला जाणार आहे.

१) भिंताडे वि.रा. (२०११), शैक्षणिक संशोधन पद्धती, नित्यनूतन प्रकाशन, पुणे.

२) मुळे रा.श. व उमाटे वि.तु. (१९८७), शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर.

३) पंडित ब.बी. (२००४), संशोधन पुणे, कॉर्टिकल प्रकाशन, पुणे.

४) आगलावे प्रदीप (२०००), संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्र, विद्या प्रकाशन, नागपूर.

५) कबीर वाजपेयी : एका समृद्ध शाळेचा प्रवास, मनोविकास प्रकाशन, पुणे.

शैक्षणिक संशोधन :-

संशोधकआपल्या विषयाशी संबंधितशैक्षणिक संशोधनाचा आढावा घेऊन सदरील विषयाचा अभ्यास करणार आहे. म्हणजेच संबंधित संशोधनाचा वापर सदरील संशोधनासाठी करण्यात येणार आहे.तसेच एम.एड, एम.फील., पीएच.डी. स्तरावरील संशोधनाचा आढावा घेण्यात येईल.

८) संशोधनाची गृहितके :-

१) लातूर जिल्हा परिषद अंतर्गत शाळांमध्ये बाला उपक्रमची प्रभावीपणे अंमलबजावणी होत आहे.

२) जिल्हा परिषद शाळांनी इमारतीला उत्तम शैक्षणिक साधन म्हणून उपयोगात आणले आहे.

३) बाला उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययनात सुधारणा झालेली आहे.

४) बाला उपक्रमाची अंमलबजावणी करताना शिक्षकांना समस्या येतात.

५) बाला हा शैक्षणिक उपक्रम विद्यार्थी शिक्षक पालक आणि प्रशासनाच्या उपयोगितेचा आहे.

९) संशोधनाची व्याप्ती :-

१) प्रस्तुत संशोधन हे लातूर जिल्हयातील पाच तालुक्यांशी संबंधित आहे.

२) प्रस्तुत संशोधन हे बाला उपक्रमाच्या अंमलबजावणीशी संबंधित आहे.

३)प्रस्तुत संशोधनहेजिल्हा परिषद शाळांतर्गत चालणाऱ्या विविधउपक्रमाशीसंबंधित आहे.

४) प्रस्तुत संशोधन जिल्हा परिषद शाळेतील गुणवत्तेशी संबंधित आहे.

१०) संशोधनाची परीमर्यादा:-

१) प्रस्तुत संशोधन हे लातूर जिल्हा परिषद शाळेपुरते मर्यादित आहे.

२) प्रस्तुत संशोधन उच्च प्राथमिक स्तरापुरते मर्यादित आहे.

३)प्रस्तुत संशोधन हे बाला उपक्रमा पुरते मर्यादित आहे.

४)प्रस्तुत संशोधन हे शैक्षणिक वर्ष २०२१-२०२३ या वर्षा पुरतेच मर्यादित आहे.

११)संशोधन पद्धती :-

व्याख्या :-

"वर्तमान काळाशी संबंधित असलेले संशोधन ज्या पद्धतीने पूर्ण केले जाते त्यास वर्णनात्मक संशोधन पद्धती असे म्हणतात."

संशोधनाचे उद्दिष्टे, माहिती संकलनाची साधने इत्यादी अनेक कारणांच्या अनेक प्रकारच्या आधारावरही शैक्षणिक संशोधन पद्धतीचे वर्गीकरण करण्यात येते त्यासाठी योग्य संशोधन पद्धतीची निवड करावी लागते.

प्रस्तुत संशोधन हे बाला उपक्रमाशी आणि विद्यार्थ्यांशी निगडित असल्यामुळे सद्यस्थितीचा अभ्यास करण्यासाठी संशोधक वर्णनात्मक संशोधन पद्धतीची निवड करणार आहे त्यामध्ये शालेय सर्वेक्षण व अंतर्गत शालेय दर्जा सर्वेक्षणपद्धतीची निवड संशोधक करणार आहे.

प्रस्तुत संशोधनात शालेय उपक्रमाचा अभ्यास केला जाणार असल्यामुळे सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येईल.

१२) संशोधन साधने :-

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधक विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक व प्रशासकीय अधिकारी यांच्याकडून माहिती संकलित करण्यासाठी प्रश्नावली, मुलाखत या साधनांचा वापर करणार आहे.

१३) जनसंख्या :-

लातूर जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या एकूण ३०० शाळा ही संशोधनाची जनसंख्या आहे.

१४) नमुना निवड :-

व्याख्या :-

George &Hatt :-

"A Sample, as the name implies, is smaller representative of a larger whole"

संभाव्यतेवर आधारित लातूर जिल्हयातील एकूण दहा तालुक्यापैकी पाच तालुक्यांची लॉटरी पद्धतीने निवड करण्यात येणार आहे. पाच तालुक्यातील उच्च प्राथमिक शाळा २५ टक्के म्हणजेच ७५ शाळा, २५ टक्के मुख्याध्यापक म्हणजेच ७५ मुख्याध्यापक, १० टक्के शिक्षक म्हणजेच १५० शिक्षक, ५ टक्के विद्यार्थी म्हणजेच ६०० विद्यार्थी आणि ०५ प्रशासकीय अधिकारी यांची सहेतूक पद्धतीने नमुना निवड करण्यात येणार आहे.

एकुण प्रतिसाद संख्या ही ८३० इतकी राहील.

१५) संख्याशास्त्रीय साधने :-

प्रस्तुत संशोधनासाठी प्रश्नावली व मुलाखतीद्वारे प्राप्त झालेल्या माहितीनुसार अर्थनिर्वचन करण्यासाठी तसेच निष्कर्ष व शिफारशी मांडण्यासाठी सरासरी, शेकडेवारी, आलेख ही संख्याशास्त्रीय साधने वापरून व गृहीतकाची पडताळणी करून ठळक निष्कर्ष काढण्यात येतील तसेच पुढील संशोधनासाठीचे विषय, शिफारशी व उपाययोजना सुचविण्यात येतील. माहिती संकलनासाठी प्रश्नावली, मुलाखातसुची ही साधने तयार करून शिक्षण क्षेत्रातील तीन नैपुण्य प्राप्ततज्ञाकडून प्रमाणित करूनच कार्यान्वित करण्यात येईल.

१६) संशोधनाचे प्रकरणीकरण :-

प्रकरण पहिले : प्रस्तावना
प्रकरण दुसरे : संबंधित साहित्य व गत संशोधनाचा आढावा
प्रकरण तिसरे : संशोधनाची कार्यपद्धती
प्रकरण चौथे : माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन
प्रकरण पाचवे : निष्कर्ष व शिफारशी

१७) कार्यवाहीचे टप्पे :-

प्रस्तुत संशोधनाच्या कार्यवाहीचे पुढील प्रमाणे टप्पे असतील

१) प्रथमतः संशोधन समस्येचा शोध घेऊन संशोधनाची गरज, महत्व, समस्या विधान, कार्यात्मक व्याख्या, संशोधनाची उद्दिष्टे, गृहितके, व्याप्ती, मर्यादा यांची मांडणी करणे.

२) संबंधित साहित्याचा आणि संशोधनाचा आढावा घेणे.

३) संशोधनासाठी उपयुक्त संशोधन पद्धतीची निवड करणे.

४) संशोधनासाठी आवश्यक संशोधन साधनांची निर्मिती करणे.

५) संशोधन साहित्याच्या सहाय्याने माहितीचे संकलन करणे.

६) संकलित माहितीचे विश्लेषण अर्थनिर्वचन करणे.

७) निष्कर्ष काढणे, शिफारशी करणे आणि पुढील संशोधनासाठी विषय सुचित करणे.

१८) वेळापत्रक :-

अ.क्र.	**संशोधन कार्य**	**कालावधी**	**महिने**
१	नोंदणी	जुलै २०२१	१
२	कोर्स वर्क व परीक्षा	ऑगष्ट२०२१ ते मार्च२०२२	८
३	संशोधनाचा प्राथमिक आढावा	एप्रिल२०२२ ते जून२०२२	३
४	संबंधितसाहित्याचा आणि संशोधनाचा आढावा	जुलै २०२२ ते ऑक्टोबर २०२२	४
५	साधन निर्मिती आणि प्रमाणीकरण	नोव्हेंबर २०२२ ते जानेवारी २०२३	३
६	माहितीचे संकलन	फेब्रुवारी २०२३ ते मे २०२३	४
७	माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन	जून २०२३ ते सप्टेंबर २०२३	४
८	अहवाल लेखन	ऑक्टोबर २०२३ ते फेब्रुवारी २०२४	५
९	प्रबंध सादरीकरण	मार्च २०२४ तेजुलै २०२४	५

१९) संदर्भ सूची :-

१) भिंताडे वि.रा. (२०११), शैक्षणिक संशोधन पद्धती, नित्यनूतन प्रकाशन, पुणे.

२) मुळे रा.श. व उमाटे वि.तु. (१९८७), शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर.

३) पंडित ब.बी. (२००४), संशोधन पुणे, कॉर्टिकल प्रकाशन, पुणे.

४) आगलावे प्रदीप (२०००), संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्र, विद्या प्रकाशन, नागपूर.

५)कदम चा. प. : शैक्षणिक संख्याशात्र, नित्यनुतन प्रकाशन पुणे.

६) पंडित बी बी : शिक्षणातील संशोधन नित्यनुतन प्रकाशन पुणे.

७) कबीर वाजपेयी : एका समृद्ध शाळेचा प्रवास, मनोविकास प्रकाशन, पुणे.

८) प्रसाद देवी (१९९९), शिक्षा का वाहन : कला, नेशनल बुक ट्रस्ट, नई दिल्ली.

९) बदेका गिजुभाई (१९९१), दिवास्वप्न, नेशनल बुक ट्रस्ट, नई दिल्ली.

१०) गुप्त अरविंद (२०००), मेरी दस उंगलीया , नेशनल बुक ट्रस्ट, नई दिल्ली.

मार्गदर्शक **संशोधक**

महेंद्र अच्युत आल्टे